Downloaded From : http://cbseportal.com/

**SET-4**

**Series JMS**

**कोड नं.**
**Code No. 8**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- प्रश्न-पत्रिकेत **8** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **10** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.
- Please check that this question paper contains **8** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **10** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* — *गुण : 80*

*निर्धारित समय : 3 घण्टे* — *अधिकतम अंक : 80*

*Time allowed : 3 hours* — *Maximum Marks : 80*



Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

## SECTION A

**1.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *6*

राजस्थान म्हणजे वाळवंटी प्रदेश. इथे पडणारा पाऊस पुरेसा नाही. त्यामुळे इथे पाण्याचा कायमचा दुष्काळ पुजलेला असतो. अशा या राजस्थानात नद्यांना. ओढयांना पाणी आणण्याचा चमत्कार राजेंद्र सिंह यांनी केला. त्यांनी तिथली केवळ झाडं-झुडपंच फुलवली नाहीत, तर तिथल्या माणसांचं जीवन देखील फुलवलं.

राजेन्द्र सिंह हे मूळचे राजस्थान मधलेच. त्यांच्या गावाचं नाव दौसा. राजेंद्र सिंह हा तिथल्या जमीनदाराचा मुलगा. घराणे मोठे असल्यामुळे त्यांचं शिक्षण सुरळीत झालं. ते आयुर्वेदाचे डॉक्टर झाले. म्हटलं असतं तर ते ऐषारामात राहू शकले असते. पण एका घटनेने त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली.

ते महाविद्यालयात शिकत असतानाची गोष्ट. त्यांच्या राजस्थान विश्वविद्यालयाच्या जवळ एक मोठी झोपडपट्टी होती. या झोपडपट्टीला एकदा आग लागली. राजेंद्र सिंह आणि त्यांचे मित्र संकटात सापडलेल्या माणसांना मदत करायला गेले. हरतन्हेने प्रयत्न करुन त्यांनी आग विझवली. पण आग विझली आणि मदत थांबली असं झालं नाही. पुढेही अनेक दिवस त्यांना जेवढी मदत ते करू शकत होते, तेवढी त्यांनी केली.

या घटनेमुळे त्यांना आयुष्याकडे बघण्याची एक वेगळी दृष्टी मिळाली. इतरांसाठी काम करत राहण्याची सामाजिक जाणीव त्यांच्या मनात झाली. त्यातूनच त्यांनी मुलांसाठी एक रात्रशाळा स्थापन केली. त्यांच्याबरोबर जो तरुणांचा गट त्यावेळी काम करत होता त्यांनी मिळून 'तरुण भारत संघ' या नावाचा एक गट स्थापन केला.

(i) नदी या शब्दाचा समानार्थी शब्द खालीलपैकी कोणता ? *1*
(सविता, सरिता, सारिका)

(ii) राजेंद्रसिंहाचे मूळ गाव कोणते ? *1*

(iii) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. *1*

**किंवा**

हरतन्हेने प्रयत्न करुन <u>त्यांनी</u> आग विझवली.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

(iv) राजेंद्र सिंह यांच्या जीवनाने कोणत्या घटनेमुळे नवे वळण घेतले ? *3*


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

**2.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *6*

केवळ धडाडी दाखवून सर्व कामं होतात असं नाही. प्रश्नाच्या मुळाशी जाऊन कल्पकतेने मार्ग काढले तर अनेक प्रश्न मुळातून सुटतात, याचं भान किरण बेदींना आहे. 1980 मध्ये पश्चिम दिल्लीच्या जिल्हा पोलीस आयुक्तपदाची सूत्रं त्यांच्याकडे आली. हा भाग त्या काळी गुंडांचा, दरोडेखोरांचा प्रदेश म्हणून ओळखला जायचा. इथल्या गुंडांना त्यांनी वठणीवर आणलं. या विभागात काही जण दारू गाळण्याचा धंदा करायचे, ज्यावेळेस किरण बेदी या प्रश्नाच्या मुळाशी गेल्या तेव्हा त्यांना जाणवलं की, हे सर्व लोक बेरोजगार आहेत, म्हणून हा धंदा करताहेत. त्यावेळी त्यांनी या लोकांना बँकांचं कर्ज मिळवून दिलं. जागा मिळवून दिली. त्यामुळे या माणसांनी आपला व्यवसाय बदलून टाकला. त्याकाळी हा एक चमत्कारच मानला गेला.

किरण बेदींचं नाव भारतभर पसरायला आणि भारताबाहेरही जायला त्यांची एक कामगिरी खूप महत्त्वाची ठरली, ती म्हणजे तिहार जेलचा त्यांनी केलेला कायापालट. तिहार तुरुंगाची क्षमता आहे दोन हजार कैद्यांची. परंतु प्रत्यक्षात तिथे आठ ते दहा हजार कैद्यांना ठेवलं जातं, एखाद्या कैद्याला तुरुंगात ठेवण्याचा हेतू हा असतो की, तिथून बाहेर पडून तो समाजात पुन्हा नीट मिसळू शकेल. पण हा हेतू सफल होणं जवळपास अशक्यच होतं. मात्र हे काम किरण बेदींनी करुन दाखवलं.

प्रश्न–खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(i) (अ) केवळ ________ दाखवून सर्व कामं होतात असं नाही. *2*
(धैर्य, धडाडी, कर्तबगारी)

(ब) तिहार तुरुंगाची क्षमता किती कैद्यांची आहे ?
(तीन हजार, दोन हजार, पाच हजार)

(ii) 1980 साली किरण बेदी कोणत्या पदावर होत्या ? *1*

(iii) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक घ्या. *1*

**किंवा**

हे सर्व लोक बेरोजगार आहेत.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iv) किरण बेदींनी गुंडांचा कोणता चमत्कार घडवून आणला ? *2*


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

## SECTION B

**3.** दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा. (कोणताही ***एक***) *7*

(i) माझा नवीन वर्षाचा संकल्प

मुद्दे — संकल्पाचे फायदे — आजपर्यंतचे केलेले संकल्प — नवीन वर्षाचा संकल्प — त्यामागचा हेतू — त्याचे फायदे — जीवनावर होणारा परिणाम — संकल्प पूर्ण करण्याचा निश्चय.

(ii) एका महापूरग्रस्ताचे मनोगत

मुद्दे — नदीकाठाजवळ घर — आजपर्यंत कधीच पूर नाही — मुसळधार पाऊस — महापूर — घर पूर्ण पाण्याखाली — संसाराची वाताहत — माणसे वाचली — सर्व मार्गांनी मदतकार्य — हिंमत — पुन्हा विश्व निर्माण करणार — दृढ संकल्प.

(iii) जगातील पेट्रोल संपले तर... !

मुद्दे — विज्ञानाची प्रगती — वाहने — प्रचंड संख्या — गतीमान जग — पेट्रोल संपले तर वाहतुकीवर परिणाम — पर्याय — हवा शुद्ध — आरोग्यावर सुपरिणाम — व्यवहार/दळणवळण ठप्प — जगाची गती थांबेल —

**किंवा**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा. गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. *7*

मुद्दे — आजीच्या नातीचे लग्न — हुंडयासाठी जावई रूसला — कोणाचेही ऐकेना — अट — विहिरभर तूप हवे — सर्वांना प्रश्न पडला — अनुभवी आजीचा सल्ला — विहिर कोदडी द्या, तूप देतो — जावई लग्नास तयार —

**4.** राधिका बेंद्रे, मंगळवारपेठ, कोल्हापूर येथून आपल्या सार्वजनिक वाचनालयासाठी पुस्तके मागविणारे पत्र सरस्वती ग्रंथ भांडार, बुधवार पेठ, पुणे यांना लिहिते. *5*
(पत्राखाली लिफाफा आवश्यक आहे)

**किंवा**

गौरी काळे, लक्ष्मीनगर, फलटण येथील सार्वजनिक उद्यानातील दुरावस्थेबाबत तक्रार करणारे पत्र व्यवस्थापक, उद्यानविभाग, फलटण जि. सातारा यांना लिहिते.
(पत्राखाली लिफाफा आवश्यक आहे) *5*


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

## SECTION C

**5.** (अ) सुचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***चार***) *4*

(i) कुसुमाग्रजांची कविता मला खूप आवडते. (विशेषनाम ओळखा)

(ii) त्याने आपला मुद्दा प्रभावीपणे मांडला. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iii) जास्त पिकलेली फळे खाऊ नयेत. (विशेषण ओळखा)

(iv) बाप रे ! केवढी ही गर्दी ! (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

(v) मला झाडावर चढता येते. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(vi) तू पुस्तके आणली म्हणून तुला अभ्यास करता आला. (उभयान्वयी अव्यय ओळखा)

(आ) पुढील वाक्ये कंसातील सुचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) आईने मला खाऊ दिला. (कर्तरी प्रयोग करा)

(ii) आजारी माणसांची काळजी घ्यावयास हवी. (प्रश्नार्थक वाक्य करा)

(iii) चोराने परेशला मारले. (प्रयोग ओळखा)

(iv) नयना वर्गात उपस्थित नाही. (होकारार्थी वाक्य करा)

(इ) सुचनेनुसार बदल करा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) कुशल खेळताना पडला. (काळ ओळखा)

(ii) मुळे व्यायाम करतात. (भविष्यकाळ करा)

(iii) तो सुंदर गाणे म्हणेल. (भूतकाळ करा)

(iv) नीताने चित्र काढले. (वर्तमानकाळ करा)

(ई) लिंग बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) माळी

(ii) सेविका

(iii) गोप

(iv) गाय

(उ) वचन बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) विहीर

(ii) गाणे

(iii) सुई

(iv) चांदणी

(ऊ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) पक्षी

(ii) पाय

(iii) चंद्र

(iv) छोटा


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

(ए) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) आशा
(ii) समान
(iii) फरक
(iv) हिंसक

## SECTION D

**6.** (अ) योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ***चार***) *4*

(i) मी तिच्या आईला म्हटले, "किती ________ बाळ आहे तुमचं !"
(गोड, गोंडस, छान)

(ii) माझ्या वैयक्तिक जीवनाच्या निराशेतही जगण्याची ________ चिवट राहिली.
(इच्छा, आशा, जिद्द)

(iii) पुस्तकाची पानं म्हणजे ________ गाणं.
(आनंदाचं, जीवनाचं, शब्दांचं)

(iv) त्याचा दिवाणखाना पाहून मी ________ झाली.
(आनंदित, थक्क, खूष)

(v) माणसांनी या पृथ्वीवर कसं जगावं हे शेवटी ________ ठरवायचं आहे.
(देवांनी, माणसांनीच, निसर्गानं)

(vi) बाबांनी या प्रयोगासाठी स्वत:चे ________ देऊ केले.
(पैसे, शरीर, घर)

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. (कोणतेही ***सहा***) *6*

(i) पन्हाळयाचा उरूस किती दिवस चालतो ?

(ii) लेखक अक्षरज्ञानाचे वर्ग चालविण्यासाठी कोठे जात असत ?

(iii) स्वामी विवेकानंदांच्या शिष्याचे नाव काय होते ?

(iv) नारायण सुर्वे यांच्या 'माझे विद्यापीठ' पुस्तकाला किती पुरस्कार मिळाले ?

(v) हिमालयामध्ये लेखकाने पूर्वी कधीही न ऐकलेला कोणता आवाज ऐकला ?

(vi) लेखिकेला परंपरेमधील कोणत्या गोष्टी त्रासदायक वाटतात ?

(vii) कोणती गोष्ट कळल्यामुळे नागाची पिल्ले हबकून गेली ?

(viii) मानवी संस्कृतीचा खरा अर्थ काय आहे ?


Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From :http://cbseportal.com/

**7.** (अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही ***तीन***) *6*

(i) रस्त्याने माणसांबरोबर प्रवास करणाऱ्या दोन गोष्टी सांगा.

↓ ↓

| 1 | 2 |
|---|---|

(ii) सामाजिक व आर्थिक विषमता दूर करणारी महात्मा गांधींची प्रतिके

↓ ↓

| 1 | 2 |
|---|---|

(iii) येणारी प्रत्येक पिढी कशी असली पाहिजे ?

↓ ↓

| 1 | 2 |
|---|---|

(iv) पुस्तकरावाने उल्लेख केलेल्या दोन खाऊंची नावे.

↓ ↓

| 1 | 2 |
|---|---|

(v) साधना आमटे यांचे लेखिकेने सांगितलेले दोन गुण

↓ ↓

| 1 | 2 |
|---|---|

(आ) 30 ते 40 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही ***दोन***) *6*

(i) 'माणुसकीचा झरा' पाठाआधारे बाबा आमटे यांचे सामाजिक कार्य थोडक्यात वर्णन करा.

(ii) 'परिवर्तनाचे उत्सव' या पाठाआधारे 'आजच्या समाजातील उत्सवाचे स्वरूप याविषयी' तुमचे मत व्यक्त करा.

(iii) नारायण सुर्वे यांना 'सोव्हिएत लॅन्ड नेहरू पुरस्कारा' चे कौतुक व महत्त्व कां वाटत होते ?

(iv) पुस्तकाला माणसे कशाप्रकारे त्रास देतात ?

**8.** (अ) योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही ***चार***) *4*

(i) घरे आणि शहरे पुन्हा निर्माण व्हावीत ________ आकाराची.
(समान, एकाच, विविध)

(ii) आजि सोनियाचा दिवस ________ देखिले संतास ।।
(डोळा, दृष्टी, आम्ही)

(iii) वळण वाकड्या नदीत आहे ________ पाणी.
(झुळझुळते, खळखळते, सळसळते)



Downloaded From :http://cbseportal.com/ Courtesy : CBSE

Downloaded From : http://cbseportal.com/

(iv) ________ सप्तकात गाते एकतारी एकस्वर.
(मंद, तार, मंद्र)

(v) दिसे ________ रूप त्याचे शिवारी.
(साजिरे, सांवळे, देखणे)

(vi) आपण सावित्रीच्या ज्योती आपण ________ वाती.
(समईच्या, रमाईच्या, दिव्यातील)

(आ) पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ***तीन***) *3*

(i) कवयित्री आश्लेषा महाजन यांनी लाख प्रणाम कोणाकोणाला केले आहेत ?

(ii) सोयराबाईने मृगजळ कशास म्हटले आहे ?

(iii) कवींच्या मते प्रलयानंतर निसर्गामध्ये कोणते बदल व्हावेत ?

(iv) 'जिथे राबती हात' या कवितेत कवीने कोणकोणत्या कष्टकऱ्यांच्या उल्लेख केला आहे ?

(v) संत सेना महाराजांच्या घरी दिवाळी दसरा केंव्हा येतो ?

**9.** (अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा. *3*

(i) मातीला ही सुगंध यावा कष्टाच्या भाकरीचा

(ii) देश आमुचा आहे 'अल्ला' तोच 'प्रभु' अन तो 'भगवान्'

(iii) नाही माझ्या घरट्यात कधी कपाळाला आठी.

(आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही ***दोन***) *4*

(i) आश्लेषा महाजन यांच्या मनात कोणत्या दोन गोष्टी आहेत ?

↓ ↓

| | |
|---|---|
| 1 | 2 |

(ii) समतेचे तुफान सुटल्यावर खालील दोन गोष्टी व्हाव्यात.

↓ ↓

| | |
|---|---|
| 1 | 2 |

(iii) मुरारी कोणाच्या घरी नांदतो ?

↓ ↓

| | |
|---|---|
| 1 | 2 |

**10.** खालीलपैकी कोणत्याही प्रश्नांची उत्तरे 30 ते 40 शब्दांत लिहा. (कोणतेही ***दोन***) *4*

(i) जुई आणि चिनारला झाड व्हावेसे कां वाटले ?

(ii) पंढरपूरच्या गंगास्नानाचे वेगळेपण कोणते ?

(iii) आजीने नातवंडांना सांगितलेले पाण्याचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.


Downloaded From : http://cbseportal.com/ Courtesy : CBSE